# जिल्हा व सत्र न्यायालय, जालना

## जिल्हा व सत्र न्यायालय, जालना येथील तसेच जिल्हा न्यायालयाच्या अधिपत्याखालील न्यायालयातील न्यायिक अधिकारी यांचे निजीकक्षात उच्च दर्जाची सर्वसोयीयुक्त ब्रॉडबॅण्ड वायफाय सुविधा पुरविणेसाठीचे दरपत्रकासाठी खालील नियम, शर्ती व अटी लागू राहतील.

01) प्रत्येक निविदाकारास फक्त एकच दरपत्रक देण्याची परवानगी असेल, याची नोंद घ्यावी. सदरील दरपत्रक हे न्यायिक जिल्हा जालना येथील जिल्हा न्यायालयाच्या अधिपत्याखालील सर्व न्यायालयातील न्यायिक अधिकारी यांचे निजीकक्षात सुस्थितीत लावणे बंधनकारक राहील.

02) या कार्यालयाचे गरजांची पूर्तता करण्यात येणारे व सर्वात कमी किंमतीचे दरपत्रक मंजुर करण्यात येतील.

03) निविदाकाराला अधिकृत पुरवठादार/एजन्सी लेटर हेडवर दरपत्रक सादर करणे व त्यावर जीएसटी क्रमांक नमुद करणे बंधनकारक राहील.

04) दरपत्रकामध्ये सर्व प्रकारच्या करांसह, इतर चार्जस् वगैर, यांचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. तसेच सदर दर हे मासिक, त्रैमासिक, सहामाही अथवा वार्षिक स्वरुपात वेगवेगळे दर्शविण्यात यावे.

05) दरपत्रक सादर करणाऱ्या निविदाकाराचा/अधिकृत पुरवठादार/एजन्सी यांचा कार्यालयाबरोबर कोणताही हितसंबंध नसावा, याची नोंद घ्यावी.

06) दरपत्रके सादर करतांना त्यामध्ये संदर्भीय पत्राचा उल्लेख करणे बंधनकारक राहील. सदरील सिलबंद दरपत्रक ही दिनांकः 01/10/2024 रोजी सायंकाळी 05:30 वाजेपर्यंत या कार्यालयात स्विकारण्यात येतील. त्यानंतर प्राप्त होणारी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाही, यांची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

07) सदरील दरपत्रके पाठवितांना ती **"मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश," जालना** यांचे नांवे पाठविण्यात यावी, तसेच पाकिटावर **"न्यायिक अधिकारी यांचे निजीकक्षासाठी सर्व सोयीयुक्त ब्रॉडबॅण्ड "** असा उल्लेख करावा.

08) सदरील दरपत्रके ही सिलबंद पाकिटात टाकून पाकिटावर **प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जालना** या पत्त्यावर पाठविण्यांत यावी.

09) सिलबंद दरपत्रके हे जिल्हा न्यायालय "त्रिसदस्यीय वस्तू खरेदी सल्लागार समिती" यांचे समक्ष जिल्हा न्यायाधीश–1, जालना यांचे निजीकक्षात दिनांक 03/10/2024 रोजी उघडण्यात येतील. जर तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास दुसऱ्या दिवशी किंवा नियोजीत वेळेत व ठिकाणी समितीपुढे उघडण्यात येतील.

10) उपरोक्त अधिकृत पुरवठादार/एजन्सी/जिल्हा व सत्र न्यायालय, जालना या न्यायालयाने ऑर्डर दिल्यानंतर पाच दिवसांच्या आत सुस्थितीत आणून देण्याची जबाबदारी संबंधीत वाहतूकदार/संस्थेची राहिल, यांची नोंद घ्यावी.

12) सदरील दरपत्रके स्विकारण्याचा व नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना राखून ठेवत आहे.

आदेशान्वये,

25/9/24

E:\rbs2022\ltr corrBroadband.odt __ 15

प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय
जालना

# <u>जिल्हा व सत्र न्यायालय, जालना</u>

## निविदा / दरपत्रक

जिल्हा व सत्र न्यायालय, जालना यांच्या अधिपत्याखालील जालना मुख्यालय व अधिपत्याखालील तालुका मुख्यालयी न्यायिक अधिकारी यांचे निजीकक्षात सर्व सोयीयुक्त ब्रॉडबॅण्ड वायफाय सुविधा पुरविणेबाबतची निविदा / दरपत्रक मागवित आहे.

सदर उच्च दर्जाची सर्वसोयीयुक्त ब्रॉडबॅण्ड वायफाय सुविधा पुरविणाऱ्या अधिकृत पुरवठादार / एजन्सी आपले दरपत्रक सोबत दिलेल्या "नियम व अटींच्या" अधिन राहून या कार्यालयाच्या खालील पत्त्यावर सीलबंद पाकिटावर **प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जालना** यांचे नावे दिनांक 01 / 10 / 2024 रोजी सायंकाळी 05:30 वाजेपर्यंत मिळतील, अशा बेताने पाठविण्याची व्यवस्था करावी. यानंतर प्राप्त झालेले दरपत्रक (निविदा) ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

25/9/24

प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय,
जालना

दिनांक 25 / 09 / 2024.

E:\rbs2022\ltr corrBroadband.odt __ 16